# चार्लीच्या सतर्कतेमुळे एका इसमाचे प्राण वाचले

दिनांक २५/०३/२०१६ रोजी पो.स्टे जवाहरनगर चार्ली क्रमांक I चे आश्विनाथ बिरकलवाड व केदार कंदे पो.स्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गजानन माहराज मंदीराजवळ त्यांना लोकांची गर्दी दिसुन आली. त्यानी तात्काळ तेथे धाव घेउुन बघीतले असता लोकांच्या जमावामध्ये एक इसम जखमी अवस्थेत बेशुध्द पडलेला दिसुन आला. चार्ली कर्मचा-यांनी जखमीस तात्काळ एका ॲटो रिक्षाने गजानन हॉस्पिटल, गारखेडा परिसर येथे नेऊन त्याचेवर वेळीच उपचार केले.सदर इसमाचे मोबाईल फोनवरुन त्याचे नातेवाईकांना फोन करुन घअनेबाबतची माहिती दिली.

नमुद जखमी श्री.अशोक मुळे वय ५० वर्ष रा. मुकुंदवाडी यांचे पत्नीस हॉस्पिटलमध्ये बोलावुन घेतेले असता त्यांनी अशोक मुळे हे मधुमेहाचे रुग्न असल्याचे कळविले. चार्ली कर्मचा-यांचे तत्पर कार्यवाहीमुळे श्री.अशोक मुळे यांना वेळीच वैदयकीय मदत मिळाल्याने पुढील धोका टळला. श्री.अशोक मुळे यांनी दिंनाक १८/०४/२०१६ रोजी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चार्ली चार्ली कर्मचा-यांचे मदतीबाबत आभार मानले.मा.पोलीस अयुक्तांनी या कामगिरी बाबत चार्ली कर्मचारी अश्विनाथ बिरकलवाड व केदार कंदे यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले व १०००/- रुपयांचे बक्षिस जाहीर केले आहे.





पोलीस आयुक्त औरंगाबाद
करीता